प्रकरण **18**

## इतर उपयोगी माहीती

1. नेहमी विचारण्यात येणारे प्रश्न.

   1. रुग्णालयात रक्तपेढी आहे का ?

   उत्तरः रुग्णालयात रक्तपेढी आहे.

   ब. रुग्णालयात शुल्क भरुन विशेष कक्ष आहे का ?

   उत्तरः रुग्णालयात शुल्क भरुन विशेष कक्ष नाहीत.

   1. रुग्णालयात वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत का ?

   उत्तरः रुग्णालयात सर्व विभागाचे वरिष्ठ डॉक्टर उपलब्ध आहेत.

   ड. रुग्णालयात औषधाचे पैसे भरावे लागतात का ?

   उत्तरः रुग्णांना औषधे मोफत दिली जातात.

   इ. रुग्णालयामध्ये तात्काळ सेवा उपलब्ध आहे का ?

   उत्तरः रुग्णालयामध्ये तात्काळ सेवा उपलब्ध आहे.ती 24 तास उपलब्ध आहे.गंभीर रुग्णांना आवश्यकता असल्यास भरती केले जाते.न्यायप्रविष्ठ वैदयकीय रुग्णांची नोंदणी करुन योग्य तो उपचार दिला जातो.

   ई. रुग्णांना क्ष-किरण व हदय स्पंदन अभिलेख काढण्यासाठी शुल्क आकारले जाते का

   उत्तरः होय. क्ष-किरण व हदय स्पंदन अभिलेख काढण्यासाठी माफक शुल्क आकारले जाते.

2. रुग्ण / नागरिक यांना दिले जाणारे प्रशिक्षण

   रुग्ण / नागरिक यांना खालील प्रमाणे प्रशिक्षण दिले जाते.

प्रसुती पुर्व तपासणी , कुटुंब नियोजन , लसीकरण ,माता स्तनपानांविषयी माहीती ओ.आर.एस., एच.आय.व्ही.,एडस आणि आरोग्य शिक्षण या विषयी माहीती.

प्रशिक्षण आणि अनुभवी समुपदेशक यांच्या मार्फत बाहय रुग्ण विभागात आरोग्य विषयक प्रशिक्षण देण्यात येते.

द्रुकश्राव्य माध्यम आणि माहीती शिक्षण माध्यमांचा प्रशिक्षणासाठी वापर केला जातो.सदर आरोग्य विषयक माहीतीसाठी पुर्व तयारीची आवश्यकता नसते.मोफत प्रशिक्षण दिले जाते.

आरोग्य केंद्राचे समाज आरोग्य सेवक समाजातुन नागरिकांना या प्रशिक्षणासाठी प्रवृत्त करतात.

4. रुग्णालयातुन दिली जाणारी प्रमाणपत्रके.

| अ क्र | प्रमाणपत्रकाचे नाव | शुल्क | अर्ज करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | वयाचा दाखला | रु. 30/- | वै.अभिलेख तंत्रज्ञ |
| 2 | उपचार चालु असल्याचे प्रमाणपत्रक | रु. 30/- | वै.अभिलेख तंत्रज्ञ |
| 3 | शाररिक दृष्ठया योग्य असल्याबाबत प्रमाणपत्रक | रु. 30/- | वै.अभिलेख तंत्रज्ञ |

रुग्णाने को-या कागदावर स्वतःचे नाव,पत्ता,दुरध्वनी क्रमांक,कशाप्रकारचे प्रमाणपत्र हवे आहे त्यांची माहीती स्वतःच्या स्वाक्षरीने अर्ज वै. अभिलेख तंत्रज्ञांकडे करावे. सोबत बाहयरुग्ण विभागाच्या कागदपत्रांची छायांकित प्रत जोडावी.शुल्क रोखीत जमा करावे. सदर अर्ज सदर आजाराबाबतचे डॉक्टर / प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या मंजुरीने रुग्णास सदर प्रमाणपत्रक दिले जाईल. सदर प्रमाणपत्रक वै.अभिलेख तंत्रज्ञ त्याच दिवशी रुग्णांना देतील.